Website: www.word-pdf-convert.com

# के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय

अ.प्र.क्र. आरटीएस-५९/परडा/०५/२००९-१०

१. श्री. किसन ओंकार इंगळे
२. श्री. यशवंत ओंकार इंगळे - - अपिलार्थी
दोघे रा.परडा ता. मोताळा जि. बुलडाणा

## विरुध्द

कलावती ज.भगवान वाघ
रा. लोणवडी ता. मलकापुर जि. बुलडाणा
ह.मु.परडा ता.मोताळा जि.बुलडाणा - - प्रतिवादी

अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालय सत्यमेव जयते बुलडाणा

## आदेश

( पारित दिनांक ७ ऑगस्ट, २०१० )

मौजे परडा ता. मोताळा जि.बुलडाणा येथिल गट क्र. ५५ मधील १.४२ हे.आर. जमिनीच्या गांव नमुना १२ मधील रकाना १५ मध्ये सन २००५-०६ या वर्षात लिहण्यात आलेले नाव कमी करुन त्याठिकाणी कलावती ज. भगवान वाघ यांचे नाव दर्ज करण्यात यावे व सन २००६-०७ चे तलाठी यांनी दिलेल्या गांव नमुना -१२ वर रकाना १५ मध्ये कोरी जागा ठेवण्यात आली आहे. त्या ठिकाणीसुध्दा दिनांक १०.९.२००७ रोजी तलाठी परडा यांनी घेतलेली नोंद कायम कराव्यांत यावी असा आदेश नायब तहसिलदार,मोताळा यांनी रा.प्र.क्र. आरटीएस-५९/ परडा/०१/२००७-०८ मधील आदेश दिनांक ३१.१०.२००७ रोजी पारित केला आहे. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी उप विभागीय अधिकारी ,मलकापुर यांचेकडे अपिल दाखल केले असता सदर अपील रा.प्र.क्र. आरटीएस-५९/परडा/०१/२००७-०८ मधील दिनांक २१.७.२००९ चे आदेशान्वये नामंजुर करण्यात आलेले आहे. हया आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी सदर अपील दाखल केलेले आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन प्रतिवादी हयांना नोटिस देण्यात आल्या आहे.

प्रतिवादी तर्फे ॲड.एस.जी. कुलकर्णी यांनी प्रकरणात लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, वादातील जमीन प्रतिवादी हयांना वारसाहक्काने मिळालेली असुन तिच्या ताबा आहे. त्यामुळे गांव नमुना -१२ ला तिचे नांवाची नोंद घेणे ही कायदेशीर जबाबदारी शासनाची आहे. २००५-०६ मध्ये प्रतिवादी हिचे नांव बदलले गेले होते व त्यामुळे ७ ब. ची कुठलीही जरुरी नाही. कारण ७ वर जी मालक आहे तिच ताबेदार आहे.अपिलार्थी यांनी जमीन कधीही वहिती केलेली नाही. त्यामुळे २००५-०६ चाच काय पण कोणत्याहि वर्षी स्विपॉडचाच ताबा व मालकी आहे. अपिलार्थी म्हणतात की दिवाणी स्वरुपाचे प्रकरण आहे. त्यामुळे त्यांचे अपिल चालणे याच कारणाने खारीज व्हावे अपिलार्थीचा मिळकतीशी काही एक संबंध नाही. त्यामुळे अपिल खारीज करुन अपिलार्थी वर रुपये पाच हजार खर्च बसविण्यात यावा.

अपिलार्थी यांचे वकील ॲड. युवराज दि. पाटिल यांनी प्रकरणात लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. त्यात त्यांनी प्रामुख्याने नमुद केले आहे की, वादातिल जमीन अपिलार्थीचे मालकीची व ताब्यात आहे. प्रतिवादी हिचा सदर जमिनीवर कोणताही ताबा नाही. ती नाशिक मध्ये राहते. वादातील जमीन वहिती केले असल्याचे परडा येथील जवळचे नातेवाईकाचे मदतीने सन २००५-०६ या वर्षा करीता वहिती केल्याचे खोटा अर्ज दाखल केला आहे. अपिलार्थी यांनी वादातील शेत पेरलेले आहे असे तलाठी यांनी त्यांच्या अहवालात नमुद केलेले आहे. प्रतिवादी हयांनी साक्षीदार म्हणुन तिचे जवळचे नातेवाईक नामदेव हरी मेंढे हयांची साक्ष दिली आहे.

Website: www.word-pdf-convert.com

त्यामुळे त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही अपिलार्थी यांनी साहेबराव प्रल्हाद पाटिल व पांडुरंग नारायण सुरडकर यांनी दिलेल्या साक्षीवरच भरोसा ठेवुन न्याय देणे जरुरी आहे. सदर प्रकरण प्रतिवादी दौलत पिराजी मेढे व नामदेव हरी मेढे यांनी संगनमताने तयार केलेले आहे.प्रतिवादी ही नाशिक येथे राहते व शेती देखील वहिती करीत नाही. सदर प्रकरण हे वारसाचे नसुन ताब्याबाबतचे आहे.वारसाचा प्रश्न निकाली काढण्याच्या अधिकार दिवाणी न्यायालयाचा आहे. वादातील जमीन असद हेतुने बळकविण्यासाठी सदरचा खेळ रचला आहे. सन २००५-०६ चे अस्सल कागदपत्रे पहावे तेव्हापासुन वादातील जमीन अर्जदारांच्याच ताब्यात आहे. म्हणुन सन २००५-०६ ते २००९-१० चे पेरेपत्रक अपिलार्थी यांचेच नांवाने नोंदवावे .

कनिष्ठ कोर्टाची प्रकरणे, त्यात पारित केलेले आदेश, उभय पक्षांचे लेखी युक्तीवाद यांचे बारकाईने अवलोकन केले आहे. उप विभागीय अधिकारी मलकापुर यांचकडील प्रकरणात पृ.क्र. १९ वर हक्क सोडल्याचा दिनांक १०.७.१९८५ चा लेख आहे त्यानुसार प्रतिवादी हयांनी वादातील जमिनीचा हक्क,पंचफुला,बाप जगन्नाथ तायडे हयांना सोडुन दिलेला आहे. हया दस्ताच्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली हयाबाबत कनिष्ठ कोर्टात कुठलाच उहापोह अथवा शहानिशा झालेली नाही. नायब तहसिलदार,मोताळा यांचेकडील प्रकरणात पृ.६५ व ६७ वर साहेबराव प्रल्हाद पाटिल व पांडुरंग नारायण सुरडकर दोन्ही रा.परडा हयांचे जबाब संलग्न आहेत.त्यात त्यांनी वादातील जमीन अपिलार्थी वहिती करीत असल्याचे नमुद आहे. त्याचप्रमाणे पृ.क्र. ९५ वरील तलाठी परडा हयांचे प्रतिवेदना नुसार वादातील जमीन अपिलार्थी वहिती करीत असल्याचे नमुद केलेले आहे. असे असतांना निव्वळ प्रतिवादी हयांनी दाखल केलेले साक्षीदार जे त्यांचे जवळचे नातेवाईक आहेत त्यांचे साक्षीवर विसंबुन कनिष्ठ कोर्टाने आदेश पारित केला आहे. तो न्यायोचीत नसल्याची माझी खात्री झाल्याने प्रकरणांत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

आदेश

अपिलार्थीचे अपील मंजूर करण्यात येत आहे. नायब तहसिलदार, मोताळा हयांनी रा.प्र.क्र. आरटीएस-५९/परडा/१/२००७-०८ मध्ये दिनांक ३१.१०.२००७ रोजी पारीत केलेला आदेश व उपविभागीय अधिकारी, मलकापुर यांनी प्र.क्र. आरटीएस-५९/परडा/०१/२००७-०८ मध्ये पारित केलेला आदेश दिनांक २१/०७/२००९ रोजी पारीत केलेला आदेश रद्द ठरविण्यात आहे. प्रकरण सखोल चौकशीसाठी व उभय पक्षांना संधी देऊन निर्णय घेण्यासाठी नायब तहसिलदार, मोताळा यांचेकडे परत करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

जिल्हाधिकारी यांचे न्यायालय अपर बुलडाणा सत्यमेव जयते

(के.एम.कामुने)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

**प्रतिलिपी**

१) उप विभागीय अधिकारी, मलकापुर यांना त्यांच्या फाईलवरील रा.प्र.क्र. आरटीएस-५९/परडा/०१/२००७-०८ सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित.

२) नायब तहसिलदार, मोताळा हयांना रा.प्र.क्र. आरटीएस-५९/परडा/१/२००७-०८ सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा